*Dr. Kirit Somaiya*
**B.Com, FCA, Ph.D.**
**Ex-Member of Parliament**
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

प्रसिद्धीसाठी

नोव्हेंबर ४, २००८

## माणसानी खाण्यास अयोग्य १.३० लाख क्लिटल आयात गहू
## राज्याचे रु. २.२७ कोटी रुपयांचे नुकसान मंत्र्यांकडून भरून घेणार

**-डॉ. किरीट सोमैय्या**

महाराष्ट्र सरकारच्या आरोग्य प्रयोगशाळेने १.३०लाख किलोग्राम्स लाल आयात गहू माणसानी खाण्यास अयोग्य जाहीर केला आहे. राज्य सरकारला हा सर्व आयात दूषित गहू फेकून देणे भाग पडले. या आयात गव्हाची किंमत सुमारे रु. २७ कोटी आहे. भाजप नेता डॉ. किरीट सोमैय्यानी मागमी केली आहे कि राज्याच्या तिजोरीचे हे सर्व नुकसान केंद्रीय कृषी आणि ग्राहक व्यवहार मंत्री आदरणीय शरद पवार आणि राज्याचे सार्वजनिक वितरण मंत्री सुनील तटकरे यांच्याकडून भरून घेण्यात यावे. हे नुकसान केवळ १४ जिल्ह्यांतील आहे. बाकीच्या १७ जिल्ह्यातील नुकसानीचा अहवाल अजून येणे बाकी आहे.

या ठिकाणी नोंद घेणे आवश्यक आहे कि भाजप गेली दोन वर्षे लाल आयात गव्हाच्या निकृष्ट दर्जाच्या विषयाचा पाठपुरावा करीत आहे. राज्यातील कॉंग्रेस-राष्ट्रवादी सरकार रु. २१ आणि रु. २२ प्रति किलो दराने दुय्यम प्रतीचा गहू आयात करीत राहिले. स्थानिक शेतकऱ्याला प्रति किलो रु.७.५० दर दिला गेला होता. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या दबावाखाली सरकारने आयात गव्हासाठी दर्जाचे नियम शिथील केले.

डॉ. सोमैय्या यानी हा विषय मुंबई उच्च न्यायालयात आणि राष्ट्रीय आणि राज्य मानवाधिकार आयोगाकडे नेला. न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे, राज्य सरकारला १ नोव्हेंबर २००७ पासून लाल आयात गहू शिधावाटप दुकानातून काढून घ्यावा लागला.

राज्य आरोग्य प्रयोगशाळेने महाराष्ट्राच्या १४ जिल्ह्यातील अहवाल सादर केला आहे.

| अनु. क्र. | जिल्हा | एकूण नमुने | | गव्हाची राशि (क्विंटल्स) | |
|---|---|---|---|---|---|
| | | विश्लेषण केलेला | अयोग्य आढळलेला | जिल्ह्यात पडून असलेला | अयोग्य आढळलेला |
| १ | धुळे | ६ | ६ | ७९५४.०५ | ७९५४.०५ |
| २ | रायगड | १४ | १४ | १४४९.६८ | १४४९.६८ |
| ३ | पुणे | १० | ६ | ५४७१.४३ | ४००१.६२ |
| ४ | सातारा | ७ | ७ | १६९७१.०० | १६९७१.०० |
| ५ | अहमदनगर | ७ | ५ | १७८४५.५७ | १६७७३.८७ |
| ६ | रत्नागिरी | ५० | ५० | १२३८९.३३ | १२३८९.३३ |
| ७ | ठाणे | ३४ | ३४ | १९३१८.०३ | १९३१८.०३ |
| ८ | नंदुरबार | ५ | ५ | ९३३४.१३ | ९३३४.१३ |
| ९ | अकोला | १ | १ | ११६०.३३ | ११६०.३३ |
| १० | उस्मानाबाद | १४ | १० | ९९४०.०० | ७१३२.०० |
| ११ | सिंधुदुर्ग | २२ | २२ | ११९७८.६९ | ११९७८.६९ |
| १२ | हिंगोली | ५ | ५ | ६४०९.८५ | ६४०९.८५ |
| १३ | सांगली | ८ | ८ | ८८३०.०० | ८८३०.०० |
| १४ | जालना | २७ | २७ | ६३८५.०० | ६३८५.०० |

**प्रसिद्धी सचिव**

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com